**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.**

**मा.ह प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ०२**

**सभावृत्तांत**

दिनांक – ११/०१२/२०२० वेळ – सकाळी – ११.०० वा.

---

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ११/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वा.ह क्षेत्रीय कार्यालयातील **पं.दीनदयाळ उपाध्याय** सभागृहामध्ये **ऑनलाईन पध्दतीने व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे** आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

१) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे - सभापती

२) मा.सुजाता सुनिल पालांडे - सदस्या

३) मा. बनसोडे राजू विश्वनाथ - सदस्य

४) मा.आशा धायगुडे – शेंडगे - सदस्या

५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत - सदस्या

६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत - सदस्य

७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र - सदस्य

८) मा.संतोष बबन कांबळे - सदस्य

९) मा.संजय गुलाब कणसे - नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय मा.संदीप खोत - क्षेत्रीय अधिकारी (ह क्षेत्रीय कार्यालय), श्री.कोळप एस.डी. प्रशासन अधिकारी, श्री.सुपे ए.के. लेखाधिकारी, मा.अनिल राऊत – प्र.कार्य.अभियंता स्थापत्य, श्री.विजयसिंह भोसले – उपअभियंता स्थापत्य, श्री.मोरे चंद्रकांत – उपअभियंता (पा.पु), श्री.जे.व्ही.पटेल – सहा.उद्यान अधिक्षक, श्री.आर.डी.शिरसाठ – उद्यान सहाय्यक, श्री.दांगडे सुनिल ज्ञानदेव – क.अ.स्थापत्य, श्री.के.एस.अंदुरे – उपअभियंता, - पापु, श्री.हरिदास सुनिल – उपअभियंता झोनिपू , श्री.एस.एन.गर्जे – क.अभियंता पाणीपुरवठा, श्रीम.यादव प्रीती- क.अभियंता जलनि:सारण, श्री.कांबळे विजय –क.अभियंता स्थापत्य, श्री.महेंद्र के.देवरे – क.अभियंता (स्था), श्री.मगर एस.एम. – क.अभियंता स्थापत्य, श्री.रमेश भोसले – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.अजय जाधव – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.उल्हास अ.देवचक्के – अतिक्रमण निरीक्षक

----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे डिसेंबर २०२० च्या दिनांक ११/१२/२०२० रोजीचे सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव - सभाशाखा** : सन्मा. सदस्य यांनी सुचविलेल्या प्रभाग कामकाजाबाबत चर्चा करणेस मान्यता मिळावी.

-----------

**ह प्रभाग समिती दिनांक ११/१२/२०२० रोजी** खालीलप्रमाणे चर्चा झाली.

**मा.आशा शेंडगे** – मा.सभापती एखादया ग्राऊंडला परमिशन देतो का?

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – प्रभाग समितीमध्ये विषय मंजूर झालेवर क्रीडा समितीपुढे विषय आल्यावर क्रीडा समितीचा निर्णय होईल. आपण क्रीडा समिती मार्फत परमिशन देतो.

**मा.आशा शेंडगे** – आजच्या मिटींगमध्ये कोरम आहे का? सर्व अधिकारी आहेत का? ऑनलाईन दिसत आहे का?

**मा.सभापती- हर्षल ढोरे** –. ऑनलाईन व प्रत्यक्ष सभागृहात सन्मा.नगरसेवक आहेत. त्यामुळे कोरम आहे.

**मा.अंबरनाथ कांबळे -** आजचे मिटींगमध्ये मी सर्वांचे मनापासून स्वागत करतो. आशाताई मिटींग ऑनलाईन अटेंड करण्यापेक्षा प्रत्यक्ष सभागृहात मिटींगसाठी आला तर बरे होईल. आजच्या मिटींगला नवीन अध्यक्ष

आहेत. आठ महिन्यांनी मिटींग घेतली आहे. अधिका-यांना माहिती पाहिजे नगरसेवक काय प्रश्न विचारणार आहे. अधिका-यांनी सर्व सांगितले पाहिजे. कोविडमध्ये सगळयांनी चांगले काम केलेले आहे. त्यांनी मनापासून चांगले काम केले आहे. प्रभाग क्र. २०,३०,३१,३२ मधील सर्व नगरसेवकांना आठ महिने अपले प्रश्न मांडता आले नाही. प्रत्येक प्रभागाचे चार नगरसेवक आहेत. कोविड सेंटर कुठे चालू केले होते. व त्यासाठी काय उपाययोजना केली आहे. प्रशासनाचे कोणते अधिकारी नगरसेवकांना भेटले. प्रभाग क्र. ३१ करीता काय उपाययोजना केली होती. ह प्रभागातील १६ नगरसेवक, स्विकृत सदस्य व नामनिर्देशित सदस्य आहेत. कोणत्या नगरसेवकांना कळविले होते. प्रभागाला काय सुविधा दिल्या आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** कोविडच्या काळामध्ये प्रत्येक प्रभागामध्ये पेशंट सापडत होते. त्यांचेसाठी वाररुम तयार केले होते. आठ शिक्षक याकरीता काम करीत होते.

**मा.अंबरनाथ कांबळे –** कोविड सेंटर कुठे चालू केले आहे याबाबत कोणते अधिकारी भेटले का? कुठे तपासणी चालू केली आहे हे सर्व सांगितले पाहिजे. कोणते अधिकारी प्रभागात गेले होते का? कोविड सेंटर कुठे चालू केले होते ते माहित नाही. प्रशासनाकडून कोणत्याही नगरसेवकांना लेटर मिळाले नाही. कुठले कागदपत्र दाखवले होते का? ही सर्व माहिती दिली का?

**मा.क्षेत्रीय अधिकारी** - स्विमींग टँक याठिकाणी कोविड सेंटर केले होते. कोविड सेंटरसाठी पाच सहा जागा पाहिल्या होत्या.

**मा.अंबरनाथ कांबळे** - कोविड सेंटर बाबत नगरसेवकांना काहीही विचारलेले नाही. याबाबत नगरसेवकांना लेखी स्वरुपात कळविलेले नाही. तरी लेखी स्वरुपात पाहिजे.

**मा.सभापती- हर्षल ढोरे –** आता हा विषय सन्मा.नगरसवेक अंबरनाथ कांबळे यांनी मांडला आहे. त्याबाबत आठ दिवसात आम्हाला लेखी स्वरुपात कळविले पाहिजे हा आदेश आहे. सर्व नगरसेवकांना किमान आठ दिवसात लेखी पत्र गेले पाहिजे.

**मा.संतोष कांबळे** - आता सन्मा.नगरसवेक अंबरनाथ कांबळे यांनी जे बोलले त्याबाबत प्रशासनाकडून समाधानकारक उत्तर दिले नाही. आम्ही फोन करुन माहिती घेत होतो. पुलावर सांगवी येथील दोन महिला अपघाताता गेल्या. त्या पुलावर पट्टे नाही. कलर नाही. पुलावर लाईट नाही अपुरा प्रकाश आहे. त्या रस्त्यावरील कामे इंजिनिअरनी केली पाहिजे.

**मा.अनिल राऊत कार्य.अभियंता स्थापत्य –** प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करुन आवश्यक ती कामे करण्यात येईल. ही गोष्ट आमच्या नजरेतून सुटली आहे. आपण ज्या सुचना केल्या आहेत त्याप्रमाणे सर्व कार्यवाही करु. स्पीडब्रेकरचे काम करु शकतो.

**मा.विजयसिंह भोसले – स्थापत्य –** त्या ठिकाणी असलेली शंकराची मुर्ती शिफ्ट करावी लागेल. काँक्रीटीकरण करुन कामे करावे लागेल. मुर्ती चुकीच्या ठिकाणी आहे.

**मा.संतोष कांबळे –** यापुर्वी ज्यांनी काम केले ते इंजिनिअरच होते का? त्यांनीच काम केले होते का? ते लोकल गवंडी होते का? डिमार्केशन केले नसेल तर त्याला कोण जबाबदार?

**मा.अनिल राऊत कार्य.अभियंता स्थापत्य -** कदाचित यापुर्वी पालिकेचे लोकांनी हे चुकीचे काम केले आहे.

**मा.संतोष कांबळे –** पालिकेच्या अधिकारी यांनी त्यांचेकडून ऍफिडेविट केले पाहिजे. नगरसेवकांना फक्त लोकांच्या समस्या कळतात. अधिका-यांनी जे आता काम करता येईल ते योग्य पध्दतीने केले पाहिजे. आतापर्यंत जे आदेश दिले आहेत ती सर्व कामे केलेली दाखवावी व त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे. माझे वॉर्डमधील झाडांच्या फांदया वाढल्या आहेत त्यांची ददददइ छाटणी करण्यात यावी.

**मा.श्री.पटेल – उद्यान -** वॉर्डमधील मागचे महिन्यात ११९ झाडांची छाटणी केली आहे. अजुन काही झाडांची छाटणी करायची असेल तर त्या झाडांची छाटणी करण्यात येईल.

**मा.माधवी राजापुरे –** स्मार्ट सिटीमध्ये काम चालू आहे. स्मार्ट सीटीचे अधिकारी आले आहे का?

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** स्मार्ट सीटी अधिकारीचे फोन आले होते.

**मा.सभापती- हर्षल ढोरे –**आजच्या मिटींगला जे अधिकारी उपस्थित नव्हते त्या सर्वांना सक्त ताकिद दया.

**मा.अंबरनाथ कांबळे –** करसंकलनचे अधिकारी कोण आहे? अधिका-यांनी लक्ष दिले नाही. पालिकेचे अधिकारी आमची घरे मोजतात. एखादा अधिकारी वॉर्डमध्ये पाठवा. नागरीकांमुळे टॅक्स मिळतो. वॉर्डमध्ये कोण सर्व्हे करतो. सर्व्हे करायला कोण लोक येतात हे नगरसेवकांना समजले पाहिजे.लोकांच्या घरात चोरी होऊ शकते अशी लोकांना शंका येत आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** पालिकेकडून त्यांना ओळखपत्र दिले आहेत.

**मा.अंबरनाथ कांबळे-** संस्थेच्या लोकांबरोबर मिटींग लावा त्यामुळे त्यांच्या कामाची पध्दत समजेल.

**मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव –** पालिकेने संस्थेच्या कर्मचा-यांना अधिकार दिलेले आहे. तेच काम करतात.

**मा.अंबरनाथ कांबळे –** नगरसेवकांना कामाबाबत कळविले पाहिजे. कोण अधिकारी आहेत ते नगरसेवकांना माहिती पाहिजे. प्रशासनाकडून काहीही सांगितले जात नाही. प्रत्येक प्रभागवाईज प्रभागात मिटींग घ्यावी.

**मा.माधवी राजापुरे –** कृष्णा चौकात हातगाडी, पथारीवाले यांचे अतिक्रमण वाढले आहे. सगळीकडे गर्दी वाढलेली आहे. सर्व गाडया हटविण्यात याव्यात. त्यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री.देवचक्के – अतिक्रमण विभाग, कार्यालयीन अधि क्षक –** महिनाभरात बरीच कार्यवाही केली आहे. दंड आपण करु शकत नाही. अतिक्रमण विभागाकडे मनुष्यबळ कमी आहे.

**मा.सभापती- हर्षल ढोरे –** स्थापत्य विभागाने एवढा खर्च करुन मंडई चालू केली आहे. परंतू ती लगेच बंद झाली. मंडईसाठी एवढा खर्च करुन का बंद पडली? अतिक्रमण विभागाकडून गाड्या उचलत नाही. नवी सांगवी, शितोळेनगर, अहिल्यादेवी चौकापर्यंत एकही गाडी दिसली नाही पाहिजे. प्रभाग क्र. ३१ व ३२ मध्ये कारवाई झाली पाहिजे. सेप्रेट अतिक्रमण विभाग वॉर्डमध्ये दयावा.

**मा.अंबरनाथ कांबळे –** सकाळ, लोकमत पेपरमध्ये माजी नगरसेवकाने तक्रार केली आहे. पोलीस खात्याने कार्यवाही केली पाहिजे. रोडला गाडया लावल्या जातात. त्याबाबत काय नियोजन करता येईल. पार्कींग केलेल्या गाडया काढण्यात याव्या.

**मा.माधवी राजापुरे -** काटेपुरम चौकामध्ये दोन्ही बाजूला गाडया लावल्या आहेत. काही गाडया धुळखात पडलेल्या आहेत. फुटपाथवर गाडया लावल्या आहेत. त्यावर कारवाई करण्यात यावी. बोर्ड लावावे.

**मा.अंबरनाथ कांबळे –** गुरुवारी आम्हाला मिटींग पाहिजे. आरोग्याचे विषय प्रशासन अधिका-याच्या सहीने जातात. टेंडर प्रभागातून जातात. ब-याच संस्था आपलेकडे कामे करतात. नाटयगृह, उद्यान टेंडर चालू आहे. डोळे झाकून काम चालले आहे. सर्व नगरसेवकांच्या पदध्तीने काम केले पाहिजे.

**मा.सभापती- हर्षल ढोरे** – आता सर्वांनी सुचना केलेल्या आहेत. गुरुवारी दुपारी २.०० वा.सर्व अधिकारी मिटींगला आले पाहिजे. सर्वांना आदेश दया. सभागृहामध्ये स्वच्छता पाहिजे. सभागृहातील सर्व कॉम्प्युटर शिफ्ट करावे. पुढच्या गुरुवारी दुपारी २.०० वा मिटींग होईल.

**मा.माधवी राजापुरे** – माझे वॉर्डमध्ये मोकाट कुत्री आहेत त्यांचा बंदोबस्त करा.

**मा.संतोष कांबळे** – शिवसृष्टी चौकातील गाडया आहेत त्या काढणे. पार्कींगला कायम स्वरुपी लावलेल्या गाडया आहेत त्या काढणे.

**श्री.पटेल - उद्यान** – स्थानिक लोकांच्या गाडया आहेत. पोलीस चौकीला संपर्क केला आहे. अशी तक्रार करु नका असे म्हणतात. गाडयांचे नंबर लिहून घेतले आहे.

**मा. क्षेत्रीय अधिकारी** – रोड ट्राफिकला पत्र दया.

**मा.सभापती- हर्षल ढोरे –** आज या आठ महिन्यानंतर झालेल्या मिटींगमध्ये सन्मा.नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दयावी.

ऑनलाईन मिटींगची अवस्था पाहिली. ती अजिबात पटलेली नाही. सर्व अधिका-यांसहीत पुढच्या गुरुवारी दुपारी २.०० वा आपले सभागृहात मिटींग ठेवत आहे. अधिका-यांना सूचना दयाव्या.

सन्मा.नगरसेवक संतोष कांबळे यांनी अपघातात दोन महिला जागीच गेल्या आहेत. त्याबाबता सुचना आहे की, स्थापत्य विभागाने जागेवर जाऊन काय करता येईल ते केले पाहिजे. शंकराची मुर्तीची पाहणी करण्यात येऊन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

स्मार्ट सीटीचे सर्व अधिकारी मिटींगला आले पाहिजे. अतिक्रमण विभागातील कार्यालय अधिक्षक श्री.देवचक्के यांनी हातगाडयावर नियंत्रण ठेवणे.तसेच मंडई चालू राहीली पाहिजे अशा पध्दतीने काम करणे. मॅनपॉवरची जबाबदारी प्रशासनाची आहे.

उद्यानातील ओपन जीम चालू करणे. ड्रेनेज, शौचालयाचे पाईप लाईनचा विषय पुर्ण करणे.

क्षेत्रीय अधिकारी यांनी चारही प्रभागातील सर्व नगरसेवक व सर्व अधिकारी यांची गुरुवार दिनांक १७/१२/२०२० रोजी दुपारी २.०० वा. याच ठिकाणी मिटींग घ्यावी.

--------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा** :सन्मा. सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

----------

**विषय क्र.१-** प्रभाग क्र.३० मधील (आई उद्यान) दापोडी, व फुगेवाडी येथील (भुयारी मार्ग) या ठिकाणी जादा कामगार व (सुरक्षा रक्षक) वाढविण्याबाबत मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ११/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र.२-** जुने संडास पाडून त्या जागी सांस्कृतीक भवन व व्यायाम शाळा करणेबाबत. मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ११/१२/२०२० चे पत्र.

**विषय क्र.३-** फुगेवाडी मधील श्रावस्ती बुध्दविहार डबलमजली करणेबाबत मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ११/१२/२०२० चे पत्र.

------------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले..**

ठराव क. ०२ विषय क्र.- १

दिनांक – ११/१२/२०२० विभाग -

सुचक – मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

**सदंर्भ –** मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ११/१२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.३० मधील (आई उद्यान) दापोडी, व फुगेवाडी येथील (भुयारी मार्ग) या ठिकाणी जादा कामगार व (सुरक्षा रक्षक) वाढविण्याबाबत. प्रभागातील आई उद्यान व भुयारी मार्ग या दोन्ही ठिकाणी जादा कामगार व सुरक्षा रक्षक वाढविण्यात यावे. दापोडील आई उद्यान येथे सकाळी जेष्ठ नागरीक व इतर नागरीक मॉर्निंग वॉकसाठी येत असतात तसेच फुगेवाडी येथील भुयारी मार्ग येथे वारंवार लाईट फोडणे, येणा-या जाणा-यांच्या छेड काढणे, चोरी करणे असे प्रकार घडत असतात. तेंव्हा पुढील काळात शाळा देखील सुरु होतील त्यामुळे अनुचित प्रकार घडम शकतो त्यासाठी तात्काळ जादा कामगार व सुरक्षा रक्षक वाढविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. ०३ विषय क्र.- २

दिनांक – ११/१२/२०२० विभाग -

सुचक – मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

**सदंर्भ –** मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ११/१२/२०२० चे पत्र.

जुने संडास पाडून त्या जागी सांस्कृतीक भवन व व्यायाम शाळा करणेबाबत. दापोडी मधील आनंदवन परिसरामध्ये पिंपळाच्या झाडाखाली एक जुने टॉयलेट (संडास) असुन ते ब-याच दिवसापासून खराब अवस्थेत पडून आहे. आणि घराघरात संडासाची सोय झाल्यामुळे ते संडास वापरण्यात येत नाही. अशा एका चांगल्या जागेचा चांगला उपयोग होण्यासाठी त्या जागेवर एक चांगले सांस्कृतीक भवन व व्यायामशाळा (डबलमजली) बांधण्यात यावी. जेनेकरुन गोरगरीब जनतेला छोटया- छोटया कार्यक्रमांची सोय करता येईल. तरी या विषयाकडे लक्ष देऊन लवकरात लवकर मार्गी लावण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. ०४ विषय क्र.- ३

दिनांक – ११/१२/२०२० विभाग -

सुचक – मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

**सदंर्भ –** मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ११/१२/२०२० चे पत्र.

फुगेवाडी मधील श्रावस्ती बुध्दविहार डबलमजली करणेबाबत .प्रभागामधील फुगेवाडी गावातील संजयनगर परि सरात एक श्रावस्ती बुध्दवि हार आहे. तर या परि सरात खूप दाटीवाटीची लोसंख्या आहे. व कोणताही कार्यक्रम असला की, तेथे कार्यक्रमास जागा पुरत नाही. व आलेल्या लोकांची गैरसोय होते. तरी हे बुध्दविहार नवीन पण्दतीत (डबलमजली) करण्यात यावी. जेनेकरुन लोकांना सोयीचे ठरेल.तरी या प्रस्तावासमान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**मा.सभापती** – मा.सर्व नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी सर्वच मिटींगला उपस्थित राहिले त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो व मिटींग संपली असे जाहिर करतो.

सही/-
हर्षल मच्छिंद्र ढोरे
सभापती ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी- ३४.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
"ह" क्षेत्रीय कार्यालय
पिपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र.हक्षेका/कावि/२३२ /२०२०
दिनांक – १७/१२/२०२०..